HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA * RAJGURU NAGAR

दि. २६ जून २०२४ रोजी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा प्राचार्य डॉ. गिरीश पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली रु. १९ या मराठी विभागात आयोजित करण्यात आली. या सभेत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे नियोजन करण्यात आले. या सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. गिरीश पिंगळे
उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे
डॉ. बाळासाहेब अनुसे.

विषय क्र.१ – शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक नियोजन करताना (UG & P.G) अध्यापन व उपक्रमांची योग्य सांगड घालण्याचे ठरले. मराठी विभागाचा (NEP) नुसार बदललेल्या कार्यभाराचा विचार करून विनाअनुदानित तत्त्वावर २ प्राध्यापकांची भरती केल्याचे मा. प्राचार्य यांनी सांगितले. प्रा. हंसराज भांगे व प्रा. तुषार गभाले यांना दि. ३ जुलैपासून बोलविण्याचे ठरले.

विषय क्र.२ – मराठी विभागाच्या अनुषंगाने वार्षिक नियोजन, अध्यापन उपक्रम, वर्कलोड या संदर्भात मा. प्राचार्यांनी मार्गदर्शन केले.

विषय क्र.३ – मराठी विभागाचा वार्षिक निकाल व प्रथम, द्वितीय, तृतीय आणि वर्ष कला आणि एम.ए. (प्रथम व द्वितीय वर्ष) च्या निकालासंदर्भात चर्चा करण्यात आली. मराठी विभागाचा निकाल चांगला लागल्याबद्दल मा. प्राचार्यांनी आनंद व्यक्त केला.

विषय क्र.४ – महाविद्यालयाच्या वेबसाइटवर मराठी विभागाची सर्व माहिती अपलोड करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची सूचना मा. प्राचार्यांनी केली.

विषय क्र.५ – नॅकच्या संदर्भात कामकाज करण्याचे, दैनंदिन कामकाज व हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेची जबाबदारी या संदर्भात मराठी विभागाने भूमिका घेऊन कामकाज करण्याची सूचना मा. प्राचार्यांनी केली.

विषय क्र. ६ – शैक्षणिक वर्ष २४-२५ च्या पहिल्या सत्रात मराठी विभागाने आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी दिली. त्यामध्ये मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन, मन में है विश्वास या आत्मकथाच्या प्रतींचे वाट्प, भीमाशंकर वनभ्रमण, वाचन प्रेरणा दिवस, साधना साप्ताहिकाच्या दिवाळी अंकांचे वाट्प इ. उपक्रमांची चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ७ – पदव्युत्तर विभागातील विषय (कार्यभार) वाट्पाची व मानधनाची चर्चा करण्यात आली. एम. ए. प्रथम वर्षाची प्रवेशसंख्या वाढविण्याचे आवाहन मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले.

विषय क्र. ८ – मराठी विभागाला प्रिंटर / स्कॅनर मिळावा अशी मागणी डॉ. संजय शिंदे यांनी केली. मा. प्राचार्यांनी या विषयाला लगेचच मान्यता दिली.

विषय क्र. ९ – सर्वांचे आभार मानून सभा संपन्न संपन्न झाली.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.